2017-18

Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2018

SPECIAL ISSUE-XXXV

# स्पर्धा परीक्षा आणि मराठी




**संपादक मंडळ :**

**विशेषांक कार्यकारी संपादक**

प्रा. अर्जुन नेरकर

डॉ. शैलजा पाटील

प्रा. गजानन भामरे

डॉ. स्नेहल मराठे

प्रा. विद्या सुर्वे

डॉ. विनोद गोरवाडकर

**मुख्य संपादक :**

डॉ. धनराज धनगर

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
January 2018

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक | लेखक /लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| @ | संपादकीय | - डॉ. धनराज धनगर | ०४ |
| १ | पदवीस्तरीय मराठीचे अभ्यासक्रम : वास्तव आणि अपेक्षा | - डॉ. जितेंद्र गिरासे | ०५ |
| २ | स्पर्धा परीक्षांमधील 'अनिवार्य मराठी'आणि तिचे स्वरूप | - डॉ.राजेंद्र सांगळे | ०९ |
| ३ | स्पर्धा परीक्षा आणि मराठी | - डॉ. बाळकृष्ण लळीत | १३ |
| ४ | मराठी व्याकरण आणि स्पर्धा परीक्षा | - डॉ. आनंदा सोनवणे | १८ |
| ५ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेसाठी मराठी | - डॉ. नामदेव माळी | २८ |
| ६ | स्पर्धा परीक्षा व मराठीचा अभ्यासक्रम | - डॉ. किरण पिंगळे | ३३ |
| ७ | यु.पी.एस.सी. परीक्षेतील मराठी साहित्याचा अभ्यासक्रम | - डॉ.रत्नमाला गोरे | ३७ |
| ८ | राज्यसेवा मुख्य परीक्षेतील मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप | - डॉ. सचिन गिरी | ३९ |
| ९ | मराठी ज्ञानभाषा व व्यवहारभाषा होण्यासाठी ...! | - डॉ. मधुकर मोकाशी | ४१ |
| १० | स्पर्धा परीक्षा आणि मराठी साहित्याचे वाचन | - डॉ. एस. आर. खैरनार | ४८ |
| ११ | स्पर्धा परीक्षेत मराठी विषयाचे महत्त्व | - प्रा. मिलिंदकुमार देवरे | ५१ |
| १२ | स्पर्धा परीक्षांमधील मराठी भाषेचे योगदान | - प्रा. अर्जुन नेरकर | ५५ |
| १३ | स्पर्धा परीक्षा आणि सामान्य ज्ञानविषयक मराठी साहित्य | - प्रा. गजानन भामरे | ५७ |
| १४ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेसाठी मराठी | - डॉ. वाल्मिक आढावे | ५९ |
| १५ | स्पर्धा परीक्षा, मराठी भाषा आणि साहित्य | - छाया कदम-पवार | ६३ |
| १६ | स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी विषयाचे महत्त्व | - सोनाली लोकडे | ६६ |
| १७ | पदवीस्तरीय मराठीचे अभ्यासक्रम वास्तव आणि अपेक्षा | - प्रा. अनंत मोगल | ६७ |
| १८ | प्रशासनिक मराठी आणि तिचा विकास | - डॉ. जितेंद्र गिरासे, प्रा. ममता भारुडे | ६९ |
| १९ | स्पर्धा परीक्षेतील निबंध लेखनाचे स्वरूप | - डॉ. स्नेहल मराठे | ७५ |
| २० | स्पर्धा परीक्षा आणि मराठी | - अनिता रानवळकर | ७७ |
| २१ | स्पर्धा परीक्षेतील मराठी भाषेचे महत्त्व | - श्री जयवंत कत्यारे | ७९ |
| २२ | Literature: A Gracious Way for Success in Career and Life | - Prof. M. S. Bhandari | ८१ |
| २३ | The Role of Marathi Language in MPSC | - Prof. R.V. Tribhuvan | ८४ |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ संहितेची सर्व जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*

**©प्रकाशक : सौ. स्वाती धनराज सोनवणे, संचालिका, स्वातीधन इंटरनॅशनल पब्लिकेशन्स, (येवला) नाशिक.**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 35 : स्पर्धा परीक्षा आणि मराठी
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

# स्पर्धा परीक्षेतील निबंधलेखनाचे स्वरुप

डॉ. स्नेहल संजय मराठे
मराठी विभाग,
म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प
ता.मालेगाव जि.नाशिक.

आजच्या युगातील विद्यार्थी हा स्पर्धा परीक्षांची जोरदार तयारी करीत असतो. त्यासाठी कठोर मेहनत घेत असतो. स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारे विविध क्लासेसमध्ये जाऊन अभ्यास करतो. महागडी पुस्तके खरेदी करतो. प्रसंगी नोकरी, व्यवसायावरही पाणी सोडत असतो. एवढे सगळे करुनही परीक्षेत जर यश मिळाले नाही निराश होतो. असे होऊ नये म्हणुन त्यांना योग्य ती दिशा दार्खविण्याची गरज निर्माण झाली आहे.

'स्पर्धा परीक्षा व मराठी' यांचा कसा अतूट संबंध आहे, अभ्यासाची पूर्वतयारी कशी करावी, जीवनाचे ध्येय निश्चित केले तर त्या दिशेने मार्गक्रमण कसे करावे याची माहिती विद्यार्थ्यांनी करुन घेणे आवश्यक असते. कोणत्याही स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम प्रथम माहिती करुन घ्यावा. कोणता घटक किती गुणांचा ? वेळेची मर्यादा यांचे नियोजन करावे. या सर्व गोष्टी जुळून आल्या की परीक्षेतील यश हमखास असते.

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतांना मराठी विषयातील 'निबंधलेखन' हा घटक अतिशय महत्त्वपूर्ण असतो. एम.पी.एस.सी. च्या मुख्य परीक्षेत मराठी आणि इंग्रजी मिळून ५०+५० गुणांचा एक पेपर असतो. त्यात २० गुणांसाठी निबंधलेखन असते. तसेच यु.पी.एस.सी. च्या परीक्षेत २५० गुणांचा निबंधलेखनाचा प्रश्न असतो. चार विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहायचा असतो. साधारणतः हजार ते बाराशे शब्दमर्यादा असते. तीन तासांत विद्यार्थ्याने एका विषयावर विचारमंथन करुन लेखन करायचे असते. एकूण १७५० गुणांपैकी २५० गुणांचा निबंध म्हणजे हा प्रश्न किती महत्त्वाचा आहे हे लक्षात येते.

संस्कृतमधून आलेला 'निबंध' शब्द, 'नि+बंध म्हणजे ज्याला कसलेही बंधन नाही तो निबंध' असा अर्थ जरी होतो. तरी देखील हे लेखन भरकटत जाणारे नसावे. शब्दमर्यादा व निवडलेल्या विषयाचे बंधन असावे. परीक्षेत निबंध लिहायचा असतो, हे ध्यानात ठेवून विद्यार्थ्यांनी सतत लिखाणाचा सराव करायला हवा. हे लिखाण मुद्देसूदपणे, शब्दसंख्येची मर्यादा राखीत करावे लागते. नेमका इथेच विद्यार्थी कमी पडतो. कारण तो केवळ पाठांतर करणे, वाचणे, प्रश्नपत्रिका सोडविणे यांनाच महत्त्व देतो. परंतु लेखनावर भर देत नाही. म्हणून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली नेहमीची अभ्यासाची पद्धत बदलायला हवी. रोजच्या अभ्यासापेकी साधारणतः दोन तास तरी अशा प्रकारच्या लिखाणाच्या सरावासाठी द्यावे. वाचलेल्या अभ्यासभागावर स्वतंत्रपणे कशाचाही आधार न घेता, मुद्देसूदपणे काही लिहिण्याचा सराव करावा. हळूहळू शब्दसंख्या वाढवत जावी. साधारणपणे दीड दोन हजारपर्यंत शब्दलेखन करण्याचा सराव करावा लिहिलेले वाचून दुसऱ्याकडून तपासून घ्यावे. झालेल्या चुका लक्षात घ्यायच्या, असे केल्याने शेवटी परीक्षेत लिहिताना त्याचा फायदा होतो. लेखनाची गती, शैली, अचूकता, मुद्देसूदपणा इत्यादी गोष्टींचा मेळ साधल्याने परीक्षकावर आपल्या व्यक्तिमत्वाचा सकारात्मक प्रभाव पडतो. लिखाणाचा सराव केल्याने, आपले लेखन विषयाला अनुसरुन तसेच योग्य शब्दमर्यादेत होते. लेखन विचार व व्यक्तिमत्वाला परिपूर्ण बनवते. म्हणून त्याचा सराव अत्यावश्यक आहे.

निबंधासाठी साधारणपणे चार विषय दिलेले असतात हे विषय अशा प्रकारे योजलेले असतात की, कोणत्याही विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांला किमान एक तरी विषय आपल्या अभ्यासाशी संबंधित वाटावा. म्हणजे विद्यार्थ्यांना विषय

ISSN : 2348-7143
January 2018

निवडताना बराच वाव असतो. ज्या विषयाची आपल्याला सविस्तर, मुद्देसूदपणे, सर्वंकष माहिती आहे आणि ज्या विषयावर आपण माहितीपूर्ण लेखन करु शकतो याची खात्री असेल असाच विषय लेखनासाठी निवडावा. प्रश्नपत्रिका हातात मिळाल्यावर विचार करुनच योग्य तो विषय निवडावा ज्याबाबत सविस्तरपणे लिहू शकू. त्यानंतर त्या विषयाचा कच्चा आराखडा तयार करुन मुद्दे निश्चित करावेत. शब्दमर्यादा ध्यानात घेऊन त्या विषयाला न्याय कसा देता येईल याकडे लक्ष द्यावे. निबंध अर्थपूर्ण कसा होईल याबाबतीत विशेष काळजी घ्यावी.

निबंधलेखनाचा सराव करण्यासाठी आधी वाचन करणे गरजेचे आहे. केवळ माध्यमिक-उच्च माध्यमिक अथवा विद्यापीठीय परीक्षांतील निबंध लेखनासाठी ज्या प्रकारची पुस्तके असतात किंवा तयार निबंध वाचले जातात तसे वाचन पुरेसे नाही. दर्जेदार वाचन करताना चालू घडामोडींसंबंधी विषयाच्या विविध पैलूंवर विविध माध्यमांमध्ये चालणाऱ्या चर्चा ऐकाव्यात, पहाव्यात, वाचाव्यात. एखाद्या विषयाला किती विविध बाजू व पैलू असू शकतात हे जाणून घ्यावे. तसेच हे सर्व कशा प्रकारे व्यक्त केले जाते हे समजून घ्यावे. त्यासाठी विविध प्रसारमाध्यमांचा पुरेपूर वापर करावा. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय वर्तमानपत्रे, मासिके, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, इंटरनेट इत्यादी मधून विविध प्रश्नांकडे अभ्यासक, तज्ञ, सामान्यव्यक्ती इत्यादी कसे पाहतात, हे जाणून घेतल्यानेच विद्यार्थ्यांचा माहितीचा साठा समृद्ध होत जातो. त्यावर स्वतःची टिपणे बनवावीत. लेखन करावे, यशस्वी उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांची अभ्यासाची पद्धती समजून घ्याव्यात. अभ्यासासाठी अधिकाधिक वेळ द्यावा.

कोणत्याही विषयाला दोनच बाजू असतात असे नव्हे, तर अनेक बाजू असतात व आपल्या निबंध लेखनामध्ये त्यातील अनेकांचा ऊहापोह करणे उत्तम केवळ आपलाच मुद्दा योग्य हे पटवून देण्यासाठी जो खटाटोप केला जातो, त्यात अनेक चुका होऊ शकतात. विषयापासून भरकटण्याची शक्यता निर्माण होते. नेमके हेच चाणाक्ष परीक्षकांच्या लक्षात येते त्याचा परिणाम आपल्या गुणांवर होऊ शकतो. म्हणून हे होऊ नये असे वाटत असेल, तर इच्छा नसताना, मारुन मुटकून विचाराला वळण देऊ नये. त्यापेक्षा प्रामाणिकपणे आपले मत व्यक्त करावे. मात्र तसे करताना ते नैतिक, मानवीय, कायदेशीर तार्किक असेल याची दक्षता घ्यावी. विविध उदाहरणे देऊन आपले मत सिद्ध करण्याचा प्रयत्न करावा.

भाषेची निवड विद्यार्थ्याने काळजीपूर्वक करावी. कोणताही मुद्दा ठाशीवपणे, सहज सोप्या शब्दांत, मोजक्याच मात्र नेमक्या शब्दांत मांडावा. प्रत्येकाची विचारशैली वेगळी असते. हीच शैली लेखनात प्रकट होते. शैली व भाषा हे निबंधातील सर्वात महत्त्वाचे घटक आहेत. विद्यार्थ्यांची स्वतंत्र लेखनशैली असावी. ती क्लिष्ट, खूप गुंतागुंतीची नसावी. मोजक्याच, नेमक्या शब्दांत आपला मुद्दा मांडावा. त्यासाठी विद्यार्थ्याने योग्य ती काळजी घ्यावी. शब्दरचना नेमकेपणाने जमेल. लेखनात पुरेसे लालित्य असेल याकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांना अनेक विषयांबाबतची अद्यावत माहिती असणे अपेक्षित असते. ज्या विषयावर आपल्याला मुद्देसूद, माहितीपूर्ण लेखन विषयाला अनुसरुन लालित्याने करता येईल याची खात्री असेल त्याच विषयाची निवड करावी. केवळ आकर्षक सुरुवात व परिणामकारक शेवट अशा पद्धतीने लेखन करु नये. आशयदेखील तेवढाच महत्त्वपूर्ण असावा. आपला विषय नाविन्याकडे जाणारा, इतरांपेक्षा वेगळा असल्याची जाणीव करुन द्यावी. निबंध हा एक सर्जनीशल लेखनप्रकार तेव्हाच होईल, जेव्हा तुमचे सखोल, चिंतनात्मक वाचन, मुद्देसूद, शब्दमर्यादेत लेखन असेल. असे लेखनच निबंधाचा आत्मा आहे.